# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे (हिवाळी) अधिवेशन, २०२४

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### पिंपळे गुरव (जि.पुणे) येथील अमृता कॉलनीतील अंतर्गत रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१) १५२४४ (२८-१२-२०२२) : श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील पिंपळे गुरव येथील अमृता कॉलनीतील अंतर्गत रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत स्थानिकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रस्त्याच्या दुरुस्तीकरीता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०७-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर रस्त्याच्या कडेने पावसाळी पाण्याचा निचरा होणेकामी स्टॉर्म वॉटर पाईप लाईन टाकणेसाठी रुपये १२ लक्ष इतकी तरतूद सन २०२२-२३ चे अंदाजपत्रकात करणेत आली आहे. सदर रस्त्याचे डांबरीकरणाद्वारे दुरुस्ती करणेकामी महानगरपालिकेने सन २०२३-२४ चे मूळ अंदाजपत्रकात रुपये १ कोटी तरतूद करणेत येत आहे. तसेच सदर कामाचे दिनांक ०६/०५/२०२२ रोजी आदेश देण्यात आले असून काम चालू आहे. सदर काम माहे मे, २०२४ अखेर पूर्ण होणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नागपूर येथील कचऱ्यावरील बायोमायनिंग बाबत

**(२) १५४४९ (२९-१२-२०२२) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथे कचऱ्यापासून बायोगॅस, कंपोस्ट खत तयार करण्यात येईल अशी घोषणा शासनाकडून करण्यात आली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घोषणेला माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये १० महिने होवूनही निविदा प्रक्रिया पूर्ण होवू शकली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कचऱ्यावरील बायोमायनिंग (रिसायकलिंग) बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

भांडेवाडी, नागपूर येथे एकीकृत घनकचरा व्यवस्थापनाकरीता १००० मे. टन + २०% क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया केंद्र १५ वर्षांकरीता डीझाईन, फायनांस, बांधा, स्वमालकीचा करा, वापरा आणि हस्तांतरण (DFBOOT) या धर्तीवर उभारणे व देखभाल दुरुस्ती करणेकरीता मनपाद्वारे रितसर निविदा प्रक्रिया राबवून निम्नतम निविदाकार M/s. SusBDe Holding B.V. (JV) नेदरलँड यांच्याशी १३/०४/२०२३ रोजी करारनामा करण्यात आला आहे. यानुसार भांडेवाडी येथे येणाऱ्या कचऱ्याचे विलगीकरण करून त्यापासून कॉम्प्रेस बायोगॅस, कम्पोस्ट, आरडीएफ आणि पुनर्वापराचे मटेरीयल इ. निर्माण करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेने वस्तु व सेवा करारासंदर्भातील शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(३) १५८९१ (२९-१२-२०२२) श्री.प्रविण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिनांक १ ऑगस्ट, २०१९ पासून वस्तू व सेवा करप्रणाली लागू झाली असून तत्पुर्वी कार्यादेश दिलेली आणि दिनांक १ जुलै, २०१७ नंतर पूर्णत्वास आलेल्या कामांच्या बाबतीत वस्तू व सेवाकरामुळे अतिरिक्त भार पडत असल्याने (मुल्यवर्धित व इतर कर कपात नंतर) तफावतीच्या रकमेबाबत कंत्राटदाराने कार्यकारी अभियंता यांचेकडे मागणी करावी, अशा सूचना नागपूर महानगरपालिकेने परिपत्रकाद्वारे व शासन निर्णयानुसार केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटदाराने फरकाच्या परतावा मागणीसाठी विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुख्य अभियंता, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांनी दिनांक ३० जुलै, २०२१ रोजीच्या पत्रान्वये सर्व विभाग प्रमुख, नागपूर महानगरपालिका यांना फरकाची रक्कम संकलित करण्याबाबत सूचना दिली असून याबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, दिनांक १९ सप्टेंबर, २०२१ चे शासन निर्णय व माहे ऑक्टोबर, २०१७ चे नागपूर महानगरपालिकेच्या परिपत्रकाद्वारे सूचित केलेल्या निर्देशानुसार कार्यवाही होत नसल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या परिपत्रकाची व शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.

नागपूर महानगरपालिका, परिपत्रक दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ अन्वये स्पष्टीकरणात्मक मार्गदर्शन सूचना जारी करण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) मुख्य अभियंता, महानगरपालिका नागपूर यांचे पत्र क्र. मनपा/मु.अ/३३५/२०२१ दिनांक ३० जुलै, २०२१ अन्वये दिनांक ०१ जुलै, २०१७ पुर्वी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले व देयकाचे प्रदान दिनांक ०१ जुलै, २०१७ नंतर झाले अशा व्हॅट व जीएसटी मधील फरकाबाबतची माहिती संकलीत करण्यास सर्व कार्यकारी अभियंता यांना सूचीत करण्यात आले आहे. याबाबत महानगरपालिका स्तरावर धोरणात्मक निर्णय घेऊन मनपाचे सनदी लेखापाल यांच्यामार्फत कंत्राटदारांची जीएसटी विवरणपत्रांची छाननी करून व्हॅट व जीएसटी मधील रुपये ५.५० कोटी इतका फरक संबंधित कंत्राटदारांना अदा करण्यात आले आहे.
(४) हे खरे नाही.
(५) मुख्य अभियंता, महानगरपालिका नागपूर यांचे पत्र क्र. मनपा/मु.अ/३३५/२०२१ दिनांक ३० जुलै, २०२१ अन्वये दिनांक ०१ जुलै, २०१७ पुर्वी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले व देयकाचे प्रदान दिनांक ०१ जुलै, २०१७ नंतर झाले अशा व्हॅट व जीएसटी मधील फरकाबाबतची माहिती संकलीत करण्यास सर्व कार्यकारी अभियंता यांना सुचीत करण्यात आले व याबाबत महानगरपालिकास्तरावर धोरणात्मक निर्णय घेऊन व्हॅट व जी.एस.टी. तील फरकाची मागणी केलेल्या कंत्राटदारांना सुमारे रुपये ५.५० कोटी इतकी फरकाची रक्कम अदा करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(४) १७५९० (२५-०३-२०२३) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.सुनिल शिंदे, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गतवर्षात सुमारे १० हजार ८८१ शेतकरी, शेतमजूरांनी आत्महत्या केली असून शेतकरी आत्महत्यांच्या आकडेवारीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकांवर असल्याची माहिती राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवाल (सन २०२१) मधून निदर्शनास आली असून माहे जानेवारी, २०२२ ते सप्टेंबर, २०२२ या नऊ महिन्यांच्या कालावधीत २,१३८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, त्यापैकी सर्वाधिक आत्महत्या विदर्भातील असून मराठवाडा, पश्चिम व उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा आकडा दिवसेंदिवस वाढत आहे, तसेच मराठवाड्यात

दुष्काळ आणि गत तीन वर्षापासून अतिवृष्टी व कर्जामुळे माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीत ९९७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाड्यातील ९९७ शेतकरी आत्महत्यांपैकी ७५६ शेतकऱ्यांच्या नातेवाईकांना शासनाने आर्थिक मदत केली असून उर्वरित २४१ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी लागवड खर्च, शेतमालास योग्य भाव, सिंचन सुविधा, पीक पध्दतीत बदल, सहज पतपुरवठा, नगदी पिकांसाठी शेतकऱ्यांना तयार करणे, पीक विमा योजनेत सुसूत्रता, शासन-प्रशासन स्तरावरुन शेतकऱ्यांची दखल, इ. बाबी शासनाने अंमलात आणल्या तर शेतकरी आत्महत्या रोखता येतील असे मत शेती अभ्यासकांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी अमरावती येथील शेती स्वावलंब मिशनची व्याप्ती वाढवणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत उपाययोजना करुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत, तसेच आत्महत्याग्रस्त मदत निधीची रक्कम वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील (२९-०७-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी शाखा अहवालानुसार सन २०२१ या वर्षी कृषी क्षेत्रामध्ये देशात एकूण १० हजार ८८१ शेतकरी व शेतमजुरांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यापैकी महाराष्ट्र राज्यात ४०६४ आत्महत्या झाल्याची नोंद आहे.

राज्यात माहे जानेवारी, २०२२ ते सप्टेंबर, २०२२ या नऊ महिन्यांच्या कालावधीत २,१३८ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे आढळून आली आहेत. त्यापैकी सर्वाधिक आत्महत्या विदर्भ विभागात माहे जानेवारी ते माहे सप्टेंबर, २०२२ कालावधीत सर्वाधिक एकूण १०७७ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे आढळून आली आहेत.

तसेच, मराठवाड्यात माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीत शेतकरी आत्महत्यांची एकूण १०२३ प्रकरणे आढळून आली आहेत.
(२) हे खरे नाही.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक २३/०१/२००६ अन्वये नापिकी, राष्ट्रीयकृत बँक/ सहकारी बँक किंवा मान्यता प्राप्त सावकराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करू न शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे आत्महत्या घडली असल्यास पात्र प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना रुपये १.०० लक्ष इतकी मदत देय आहे. शेतकरी आत्महत्यांची १०२३ प्रकरणांपैकी ८०८ प्रकरणे पात्र व १३८ प्रकरणे अपात्र ठरली आहेत.

(३), (४) व (५) होय. शेतकरी आत्महत्या या विषयावर अभ्यास करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने विविध संस्था, तज्ञ व्यक्ती व अभ्यासगट यांचेमार्फत अभ्यास केला असून त्यातील शिफारशींप्रमाणे शासनामार्फत उपाययोजना करण्यात येत आहेत.

शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी अमरावती येथील कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची व्याप्ती वाढविण्याची कार्यवाही शासन स्तरावरून सुरू असून शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रामुख्याने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१) कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अंतर्गत शेतकऱ्यांना समुपदेशनाची व प्रबोधनाची आवश्यकता विचारात घेऊन विविध उपाययोजना राबविल्या जातात.

२) विशेष मदतीच्या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या विकासासाठी "कृषी समृध्दी" योजनेच्या अनुषंगाने विविध विभागांकडून उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

३) शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना मोफत शिक्षणाची योजना यांच्या अंमलबजावणीला गती देणे यासाठी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन कार्यरत आहे.

४) शेतमालाला हमीभाव, PM-KISAN सारख्या योजनांमार्फत शेतकऱ्यांवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबविण्यात आली.

५) शेतकऱ्यांना केवळ १.०० रूपये भरून पीक विमा योजनेचा लाभ देण्याकरीता "सर्वसमावेशक पीक विमा योजना" सन २०२३-२४ पासून राबविण्यास दिनांक २३ जून, २०२३ च्या कृषी विभागाच्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे.

६) राज्य शासनाकडून प्रतिवर्ष रुपये ६,०००/- शेतकऱ्यांना देण्यासाठी नमो किसान शेतकरी महासन्मान निधी योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे.

७) नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास राज्य आपत्ती व्यवस्थापन निधीतून अथवा वेळ प्रसंगी राज्य शासनाच्या निधीतून मदत दिली जाते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील बियाणांच्या किंमती नियंत्रणात आणण्याबाबत

**(५) १९१४६ (०८-०८-२०२३) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतांश बँका शेतकऱ्यांना कर्ज देत नसल्यामुळे तसेच बियाणांच्या वाढत्या किमतींमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून त्यांना खाजगी सावकरांकडून कर्ज घेऊन पेरणी करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बियाणांच्या वाढत्या किंमती नियंत्रणात ठेवण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०४-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) सन २०२२ मधील बियाणे किमतीची सन २०२३ मधील बियाणे किमतीशी तुलना केली असता बियाणे किंमतीमध्ये अल्प प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. तसेच मुख्य पीक सोयाबीन बियाण्याच्या किंमतीमध्ये २९ ते ३७ टक्क्यांनी घट झाली आहे. महाबीज बिजोत्पादन धोरणानुसार बिजोत्पादक शेतकऱ्यांना दिले जाणारे दर हे कृषी उत्पन्न समितीमधील बाजार भावावर अवलंबून असतात. त्यामुळे बाजारभावांचा परिणाम हा बियाणे किंमतीवर सुध्दा दिसतो. बियाणे कायदा हा केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून कायद्यामध्ये बियाणे दरावर नियंत्रण ठेवण्याची कोणतीही तरतूद नाही. तसेच शासनाकडून बियाण्यावर वस्तु व सेवाकर आकारला जात नाही. बहुतांशी बियाणे शेतकऱ्यांच्या शेतावर उत्पादित केले जात असून बियाण्याच्या किंमतीवरील बराचसा हिस्सा शेतकऱ्यांनाच अदा केला जातो. कापूस बियाण्याच्या किमंती या केंद्र शासनामार्फत निश्चित करण्यात येतात. मागील दोन-तीन वर्षातील कापूस बियाण्यांच्या किंमतीत नगण्य वाढ झाली आहे.

कृषी विभागामार्फत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत बियाणे वितरणाकरीता अनुदान दिले जाते. केंद्र पुरस्कृत तेलताड अभियानाअंतर्गत प्रमाणित बियाणे अनुदानावर वितरीत करण्यात येते. तसेच बियाणांची गुणवत्ता नियंत्रित राहण्याच्या दृष्टीकोनातून राज्यात ३९५ भरारी पथकांची स्थापना करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील वन विभागांतर्गत असलेल्या शेतात रोही व रानडुक्कर मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान करीत असल्याबाबत

**(६) २०८८७ (१५-०१-२०२४) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील वन विभागांतर्गत असलेल्या शेतात मोठ्या प्रमाणात रोही व रानडुक्कर ही शेती पिकांचे नुकसान करीत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नुकसानीबाबत शासनाकडून अत्यल्प मदत मिळत असून सदर नुकसानीची दखल संबंधित वनाधिकारी तातडीने घेत नसल्याने शेतकरी कर्जबाजारी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील वन विभागाद्वारे वन हद्दीत कुंपण बांधण्याबाबत तसेच नुकसान भरपाईच्या रकमेत वाढ करुन सुरक्षेकरीता आवश्यक उपाययोजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (०८-०८-२०२४) :** (१) व (२) वन्यप्राण्यांमुळे झालेल्या नुकसानीकरीता नुकसान भरपाई अदा करण्याची प्रकिया ही ऑनलाईन असून अर्ज प्राप्त झाल्यानंतर विहीत मुदतीत प्रचलित तरतूदीच्या अनुषंगाने अर्थसहाय्य अदा करण्यात येते. त्याअनुषंगाने महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरीता नुकसानभरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ दिनांक ०१/०२/२०२४ पासून अंमलात आला आहे.

नागपूर जिल्ह्यातील वनालगत असलेल्या शेतात रोही व रानुडकरांनी यासारख्या वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केल्याची सन २०२०-२१ मध्ये ७४२५ प्रकरणे, सन २०२१-२२ मध्ये ३९८२ प्रकरणे, सन २०२२-२३ मध्ये ३४८९ प्रकरणे व सन २०२३-२४ (माहे डिसेंबर, २०२३ पर्यंत) २४४५ प्रकरणे निदर्शनास आली असून प्रचलित तरतूदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास अनुक्रमे रुपये ५३१.६१ लक्ष, रुपये २६८.२० लक्ष, रुपये २५४.४५ लक्ष व रुपये १४५.२३ लक्ष इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(३) वन्यप्राण्यांमुळे वनालगतच्या शेतीमध्ये होत असलेले नुकसान कमी करण्याच्या दृष्टीने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन विकास योजनेची व्याप्ती वाढवून शेतीला सौर ऊर्जा कुंपणाची बाब समाविष्ट करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भांडेवाडी (जि.नागपूर) परिसरात शहरातील संपूर्ण कचऱ्याचे संकलन करुन वर्गीकरण आणि प्रक्रिया करण्याबाबत

**(७) २१३२१ (०५-०१-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडेवाडी (जि.नागपूर) परिसरात शहरातील संपूर्ण कचऱ्याचे संकलन व वर्गीकरण प्रक्रिया करण्यासाठी गेल्या वर्षापासून नागपूर महानगरपालिकेच्यावतीने जर्मनी येथील अथवा अन्य कंपन्याच्या सहाय्याने करारनामा करण्यात आला होता, तसेच नागपूर शहरातील कचऱ्यापासून सीबीजी गॅस बनविण्यासाठी नेदरलँड सुसबिडी या कंपनीसोबत दिवसाला १००० मेट्रीक टन कचऱ्याचे कॉन्ट्रॅक्ट माहे सप्टेंबर, २०१३ च्या दरम्यान दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये M/s SusBDe Holding B.V.(JV) यांची L१ निविदा प्राप्त झालेली असून त्यांना दिनांक ०६/१०/२०२२ रोजी Letter of Intent देण्यात आलेले असून त्यांच्याशी करारानामा करण्याचे काम प्रगतीपथावर असून संबंधित कंपनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारापासून प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे निश्चित केले असतानाही त्यासाठी विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर महानगरपालिकेच्यावतीने सुक्या व ओल्या कचऱ्याच्या विक्रीच्या माध्यमातून बायोगॅस भारत पेट्रोलियम कंपनीला किती उत्पन्न मिळण्याचे नियोजन आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भांडेवाडी डंपिंग यार्डमधील कचऱ्यावर बायोमायनिंगची प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०७-२०२४) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

भांडेवाडी, नागपूर येथे एकीकृत घनकचरा व्यवस्थापनाकरीता १००० मे. टन + २०% क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया केंद्र १५ वर्षांकरीता डीझाईन, फायनांस, बांधा, स्वमालकीचा करा, वापरा आणि हस्तांतरण (DFBOOT) या धर्तीवर उभारणे व देखभाल दुरुस्ती करणेकरीता मनपाद्वारे रितसर निविदा प्रक्रिया राबवून निम्नतम निविदाकार M/s. SusBDe Holding B.V. (JV) नेदरलँड यांना दिनांक ०६/१०/२०२२ रोजी Letter of Intent देण्यात आले. तसेच दिनांक १३/०४/२०२३ रोजी करारनामा करण्यात आला. करारनाम्यानुसार महानगरपालिकेद्वारे M/s. SusBDe Holding B.V. (JV), M/s. SusBDe LOC Nagpur Pt. Ltd. (SPV) यांना मौजा भांडेवाडी येथील ३० एकर जागा हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. तसेच कंपनीद्वारे दिनांक २७/११/२०२३ पासून बांधकामास सुरुवात करण्यात आली आहे.

(३) प्रकल्प उभारणी व देखभाल दुरुस्तीकरीता लागणारा संपूर्ण खर्च नियुक्त कंपनीद्वारेच करण्यात येणार आहे. करारनाम्यानुसार कचऱ्यावर प्रक्रियेनंतर संपूर्ण कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे व निर्माण होणारे बाय-प्रोडक्ट विकण्याचे अधिकार कंपनीला देण्यात आलेले आहे. कंपनीद्वारे सादर केलेल्या आर्थिक प्रारूपानुसार प्रथम वर्षात रुपये १५ लक्ष ही रॉयल्टी भविष्यात वाढीव स्वरूपात महानगरपालिकेस प्राप्त होण्याचे नियोजन आहे.

(४) भांडेवाडी डम्पिंग यार्ड येथील लँडफिल साईटमधील जुन्या जमा कचऱ्यापैकी ६ लक्ष मे. टन कचऱ्यावर बायोमायनिंगची प्रक्रिया करण्याकरीता नागपूर स्मार्ट सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमीटेड यांचेद्वारे मे. झिग्मा ग्लोबल इनवायरन सोल्युशन प्रा.लि. यांना दिनांक २१/०९/२०२१ रोजी कार्यादेश देण्यात आले होते. हे काम फेब्रुवारी, २०२४ मध्ये पूर्ण झालेले असून अंदाजे ८ एकर जागा मोकळी करण्यात आलेली आहे.

तसेच उर्वरीत १५.३० लक्ष मे.टन कचऱ्यावर स्वच्छ भारत मिशन २.० अंतर्गत बायोमायनिंग प्रक्रिया करण्याकरीता महानगरपालिकेद्वारे निविदा प्रक्रिया राबवून निम्नतम निविदाकार मे. झिग्मा ग्लोबल इनवायरन सोल्युशन प्रा.लि. यांना कार्यादेश दिनांक १५/१२/२०२३ रोजी देण्यात आलेले असून कामास सुरुवात करण्यात आलेली आहे. हे काम डिसेंबर, २०२६ पर्यंत पूर्ण करणे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्राचे दर्शन घडविणारा शिवसृष्टी प्रकल्प उभारण्याबाबत

**(८) २१३५१ (०५-०१-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात पुण्याच्या धर्तीवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्राचे दर्शन घडविणाऱ्या शिवसृष्टी प्रकल्प हा राहटे कॉलनी चौकाजवळील कृषी विद्यापीठाच्या ५ एकर जागेवर उभारण्यात यावे हा प्रस्ताव नागपूर सुधार प्रन्यासच्यावतीने तयार करण्यात आला असून अद्याप कृषी विभागाची एनओसी या प्रकल्पाकरीता मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पासाठी नागपूर सुधार प्रन्यासच्यावतीने एकूण किती रुपयांचा निधी मंजूर केला आहे, तसेच सदर प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने कृषी विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.

नागपूर सुधार प्रन्यासकडून दिनांक ११/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अधिष्ठाता, डॉ. पंजाबराव देशमुख, कृषी विद्यापीठ, नागपूर यांना लेखी संमतीबाबत कळविण्यात आले आहे.

कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख, कृषी विद्यापीठ, अकोला यांचे दिनांक २४/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकल्पाकरीता अद्याप ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले नसल्याचे कळविले आहे.
(२) मौजा, खसरा क्र. २१७/३, २१७/१ येथे पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या एकूण ५ एकर जागेत शिवसृष्टी प्रकल्पाकरीता नागपूर सुधार प्रन्यासद्वारे एकूण रुपये १७० कोटीचे प्रस्तावास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. प्रशासकीय मान्यता व निधी वितरणाची कार्यवाही पर्यटन विभाग व नगरविकास विभागाच्यास्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला महानगरपालिकेच्या मालमत्ता कराची थकबाकी वसुल करण्याबाबत

**(९) २१७६८ (०५-०१-२०२४) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला महानगरपालिकेच्या मालमत्ता कराची शासकीय थकबाकी कोट्यवधी रुपयांच्या प्रमाणात असून ती वसूल न करता महानगरपालिका नागरिकांना थकबाकी भरण्यासाठी तकादा लावत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालमत्ता कर थकीत असल्यामुळे त्याचा विपरित परिणाम विकास कामांवर होत असून उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय मालमत्तेची थकबाकी किती आहे व नागरीकांच्या मालमत्तेची थकबाकी किती आहे याचा आढावा घेऊन उक्त दोन्ही स्वरुपाच्या थकबाकी वसूल करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) अकोला महानगरपालिका हद्दीमध्ये खुला भुखंड निवासी, अनिवासी मालमत्ता एकूण १,६९,६७१ व शासकीय मालमत्ता २०७३ असे एकूण १,७१,७४४ मालमत्ता आहेत. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील अनिवासी/निवासी मालमत्तांची थकीत मागणी रुपये १११.६९ कोटी व चालु मागणी रुपये ७६.८७ कोटी आणि शासकीय मालमत्तांची थकीत मागणी रुपये ३.८७ कोटी व चालु मागणी रुपये ३.०९६ कोटी अशी एकूण मागणी रुपये १९५.५३ कोटी एवढी आहे. त्यापैकी आजस्थितीत मालमत्ता कराची एकूण रुपये ५०.६८ कोटी वसुली करण्यात आली आहे. उर्वरीत थकीत व चालु मालमत्ता कराची वसुली करण्याकरीता स्थानिक इलेक्ट्रानिक मिडीया, वृत्तपत्रामधुन, घंटा गाडीवरील लाऊड स्पिकर, व्दारे मालमत्ता कर भरणेबाबत वेळोवळी आवाहन करण्यात येत आहे.

ऑनलाईन मालमत्ता कराचा भरणा करण्याकरीता https://amcakola.in वेबसाईट कार्यान्वित करण्यात आली आहे. मालमत्ता धारक यांचे घरोघरी व शासकीय कार्यालयात जावून प्रत्यक्ष भेटी घेऊन कराचा भरणा करणेबाबत कळविण्यात येत आहे. मालमत्ता कराची वसुली करण्याकरीता पुर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण झोन कार्यालय सुट्टीच्या दिवशी सुरु ठेवून वसुली करण्यात येते, झोन अंतर्गत मुख्य ठिकाणी वसुलीचे कॅम्प लावून वसुली वाढविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे. थकीत मालमत्ता कराची वसुली होण्याकरीता मालमत्ता धारकांना जप्ती पूर्व सुचना देवून पुढील जप्ती व लिलावाची कार्यवाही करुन जास्तीत जास्त मालमत्ता कराची वसुली करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पातुर (जि.अकोला) येथील गायरान जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत

**(१०) २१७९३ (०३-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातुर (जि.अकोला) येथील तहसिल कार्यालयावर ई क्लास, एफ क्लास, गायरान जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याच्या मागणीसाठी जन आक्रोश मोर्चा काढण्यात आल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मोर्चाच्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२३-०७-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचे महसूल व वन विभागाव्दारे सार्वजनिक वापरातील जमिनी/ गायरान जमिनी इतर प्रयोजनासाठी वापरण्यावर निर्बंध घालण्याबाबत व अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत शासन निर्णय क्र. जमीन ०३/२०११ /प्र.क्र.५३/ज-१ दिनांक १२ जुलै, २०११ निर्गमित करण्यात आला आहे.

उक्त शासन निर्णयामधील परिच्छेद ९(१) नुसार यापुढे गायरान जमीन अथवा सार्वजनिक वापरातील जमीन फक्त केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या सार्वजनिक सुविधा (Public Utility) व सार्वजनिक प्रयोजन (Public Purpose) यासाठी अन्य जमीन उपलब्ध नसल्यास याबाबत विचार करावा असे नमूद असून परिच्छेद ९(२) नुसार गायरान/गुरचरण अथवा गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापरातील जमीन कोणतीही व्यक्ती, खाजगी संस्था, संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी मंजूर करण्यात येऊ नये असे नमूद आहे.

तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील जनहित याचिका क्र. ०२/२०२२ प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पुढील आदेश होईपर्यंत कोणत्याही परिस्थितीत सिव्हील अपील क्र. ११३२/२११ @ एसएलपी (सी) ३१०९/२०११ जगपाल सिंग विरुध्द पंजाब शासन व इतर या प्रकरणी मा.सर्वोच्च

न्यायालयाच्या आदेशामध्ये विहीत केलेली प्रक्रिया वगळता इतर कोणत्याही प्रकारची अतिक्रमणे कोणत्याही अधिकाऱ्याने/प्राधिकाऱ्याने नियमानुकूल करु नयेत असे नमूद आहे. यामुळे निवेदनातील मागणीबाबत कार्यवाही करणे शक्य होत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) कार्यालयातील निबंधक यांनी केलेल्या अनियमिततेबाबत

**(११) २१९७२ (०५-०१-२०२४) श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) या कार्यालयातील निबंधक यांनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ ते दिनांक १७ फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत आपल्या पदाचा गैरवापर करुन मोठ्या प्रमाणात अनियमितता केल्यामुळे त्यांना दिनांक २८ मार्च, २०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अनियमितता कोणकोणत्या कामामध्ये व किती प्रमाणात केली आहे याबाबतचा तपशिल देण्यात यावा,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनियमितता प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१) होय. श्रीमती इंदिरा अस्वार, निबंधक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी दिनांक १४/१०/२०२२ ते दिनांक १७/०२/२०२३ या कालावधीत केलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने त्यांना दिनांक २८/०३/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.
(२) व (३) श्रीमती इंदिरा जयसिंग अस्वार, निबंधक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी या नात्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार अपिलावरील आदेश मा.राज्य माहिती आयुक्त यांच्या व्दितीय अपिलावरील सुनावणीच्या दिवशी पूर्वलक्षी प्रभावाने बदलणे, मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.३६५३/२०२२ संदर्भात सुनावणी असताना प्रलंबित ०६ प्रकरणांची नस्ती जाणून बूजून प्रलंबित ठेवणे, शासन निर्णयाच्या विरोधात स्वत:च्या सोयीसाठी दिशाभूल करणारे पत्र वरिष्ठांनी मंजूरी नाकारली असताना परस्पर निर्गमित करणे, साधनांचे कार्यारंभ आदेश रद्द करण्याचे प्रारुप दिनांक १४/०९/२०२२ रोजी स्वाक्षरी करुनही ती नस्ती महासंचालकाना सादर न करणे, बार्टी संस्थेवर दिशाभूल करणारा मोर्चा घेऊन येणाऱ्या नागरिकांस पोलीस विभागामार्फत सुयोग्य कार्यवाही करण्याबाबतची विनंती पत्र प्रलंबित ठेवणे, भिमा कोरेगांव येथील नागरिकांना भोजन दानासाठी रुपये ४०.०० लक्ष वरुन रुपये ६०.०० लक्ष करण्याची निविदापूर्व बैठकीमधील शिफारस मान्य करुन आर्थिक दिशाभूल करणे, तसेच महासंचालक, बार्टी यांच्याविरुध्द

कोरेगांव पार्क पोलीस ठाणे पुणे शहर येथे तक्रार करणे, तसेच महासंचालक, बार्टी यांचेवर अत्यंत गंभीर आरोप करणे इत्यादी दोषारोप श्रीमती इंदिरा अस्वार, निबंधक डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेवर ठेवण्यात आले असून शासन ज्ञापन दिनांक ०८/०६/२०२३ अन्वये त्यांचेवर दोषारोप सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने बजाविण्यात आले आहेत. तसेच त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या अनुषंगाने त्यांनी सादर केलेले निवेदन विचारात घेऊन त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाची चौकशी करण्यासाठी शासन आदेश दिनांक १२/१०/२०२३ अन्वये चौकशी अधिकारी तसेच सादरकर्ता अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) २२०२६ (०५-०१-२०२४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मंजूर ४६६१ पदांपैकी १७८२ पदे रिक्त असून शासनाने महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या ३५ टक्क्यांपेक्षा जास्त उत्पन्न नोकर पगारावर खर्च न करण्याचे बंधन घातल्यामुळे महानगरपालिकेस मंजूर पदे भरण्यास अडचणी निर्माण होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेतील पदे मंजूर असूनही जाचक अटीमुळे रिक्त पदे भरता येत नसल्यामुळे कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा कार्यभार येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोल्हापूर महानगरपालिकेतील ३५ टक्क्यांची जाचक अट शिथिल करुन कोल्हापूर महानगरपालिकेत रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) कोल्हापूर महानगरपालिका आस्थापनेवरील अत्यावश्यक सेवेची व अत्यंत गरजेची पदे भरण्यासाठी सन २०२३ च्या पदभरतीकरीता केवळ एक वेळची बाब म्हणून शासन निर्णय, दिनांक ०४/०५/२००६ मधील आस्थापना खर्चाच्या ३५% मर्यादेची अट शिथील करण्यास दिनांक १४/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार पदभरतीबाबतची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यात माफक दरात वाळू उपलब्ध होण्याच्या दृष्टीने वाळू डेपो सुरू करण्याबाबत

**(१३) २२१९६ (०३-०१-२०२४) श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात सामान्यांना माफक दरात वाळू उपलब्ध व्हावी या दृष्टीने शासनाने नवीन वाळू धोरणेच्या अनुषंगाने जिल्ह्यात सात डेपो सुरू करण्यात येऊनही सामान्यांना स्वस्त दरात वाळू उपलब्ध होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डेपोतून विक्री होणारी वाळू १५ दिवसात बंद केली जाते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामान्यांना स्वस्त दरात वाळू उपलब्ध होण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०९-०८-२०२४) :** (१), (२), (३) व (४) अशी बाब नाही.

शासनामार्फत वाळू/रेती उत्खनन, वाहतूक व ऑनलाईन प्रणालिद्वारे विक्री धोरण दिनांक १९/०४/२०२३ च्या अनुषंगाने लातूर जिल्ह्यात १८ डेपो निश्चित करण्यात आले असून त्यापैकी ३ वाळू डेपोच्या निविदा यशस्वी होऊन निविदाधारकांना कार्यारंभ आदेश दिनांक ०३/११/२०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

## नागपूर शहरातील नदी व तलावांचे संरचनात्मक लेखापरिक्षण करण्याबाबत

**(१४) २२२४६ (०५-०१-२०२४) : श्री.प्रविण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात माहे सप्टेंबर, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरातील अनेक भागांचे नुकसान झाले असून नागपूर शहरातील नाग नदीचा बंधारा, अंबाझरी व इतर तलावांच्या बंधाऱ्यांचेही नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी मा.मंत्री यांनी केलेल्या पाहणीमध्ये भविष्यात अशा प्रकारचे नुकसान टाळण्यासाठी नाग नदीवर हँगिंग पूल उभा करणे, संरक्षण भिंत बांधणे इ. कामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर शहरातील सर्व नदी व तलावांचे संरचनात्मक लेखापरिक्षण करुन त्यांच्या देखभाल, दुरुस्ती व नुतनीकरणांच्या कामांकरीता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ ला झालेल्या अतिवृष्टीने क्षतिग्रस्त झालेल्या नागनदी व इतर नद्या तसेच नाल्याच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामाकरीता शासनाने विशेष आर्थिक पॅकेज अंतर्गत रुपये १६३.२३

कोटी इतक्या खर्चास महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक २२/०२/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

(३) नागपूर शहरातील सोनेगाव, सक्करदरा तलावांचे संवर्धन व पर्यावरणीय सरंक्षणाच्या दृष्टीने विविध कामे करण्यात येत असून लेंडी, नाईक, बिनाकी, मंगळवारी व पोलीस लाइन टाकळी तलाव पुनरुज्जीवन प्रकल्पाअंतर्गत तलाव संवर्धनाचे दृष्टीने विविध कामे प्रगतीपथावर आहेत.

नागपूर शहरातील तलावांच्या कामाचे स्ट्रक्चरल ऑडिट अद्याप करण्यात आलेले नाही. हाती घेतलेली कामे पूर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेच्यास्तरावर याबाबत निर्णय घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेतील सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निवृत्तीवेतनाबाबत

**(१५) २२६७० (०५-०१-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेतील सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित निवृती वेतन अदा करताना मूळ निवृत्ती वेतनातून केलेल्या दुसऱ्या अंश राशीकरणाच्या भागाच्या चुकीच्या कपातीबाबतचे निवेदन येथील डॉक्टरांनी पुणे महानगरपालिका यांना दिले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेतील सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार वाढीव ग्रॅच्युइटी रक्कम, दुसऱ्या टप्प्याच्या वाढीव अंशराशीकरणाच्या रकमेचा चेक, सुधारित मूळ निवृत्तीवेतनात दोन वेगवेगळया टप्प्यात कपात करून सेवानिवृत्ती वेतनाच्या फरकाची सुधारित बिले व त्यानुसार फरक तसेच अंशराशी/वसुली सेवानिवृत्ती वेतनातून करण्याच्या वसूलीची रक्कम निर्धारीत करुन कर्मचाऱ्यांना कळविणे व अदा केलेल्या वाढीव ग्रॅज्युएटी व वाढीव अंश राशीकरणाची नोंद पीपीओवर करणे इत्यादी मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेतील सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०७-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मुद्दा क्र.२ मधील बाबी मुख्य लेखा परीक्षक यांच्या मान्यतेने व शासन निर्णय क्र.सेनिदे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दिनांक ०१/०३/२०१९ नुसार करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मोलगी (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) येथे अप्पर तहसिल कार्यालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव प्रलंबित असलेबाबत

**(१६) २३१८९ (१८-०७-२०२४) : श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोलगी (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) येथे अप्पर तहसिल कार्यालय स्थापन करण्याबातचा प्रस्ताव तहसिलदार, अक्कलकुवा यांनी विहित नमुन्यात जिल्हाधिकारी यांचेमार्फत शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रस्तावास मंजुरी मिळणेकरीता लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री महसूल तथा अतिरिक्त मुख्य सचिव यांना निवेदन दिले होते, तसेच अप्पर तहसिल कार्यालय निर्मिती करीता सादर केलेल्या प्रस्तावांचे पुनर्निरीक्षण करण्याकरीता समिती नेमण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने समितीचा अहवाल प्राप्त होऊन प्रस्तावास मान्यता दिली आहे काय,

(४) नसल्यास, विलांबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०८-२०२४) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

विभागीय आयुक्त, नाशिक विभाग कार्यालयाकडून दिनांक ०२/०५/२०२३ च्या पत्रान्वये मोलगी येथे अपर तहसिलदार कार्यालय निर्मितीचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

(२) व (३) मोलगी येथे अपर तहसिलदार कार्यालय निर्मिती बाबतीत लोकप्रतिनिधी यांच्याकडून शासनास निवेदने प्राप्त झालेली आहेत. राज्याच्या सर्व ६ विभागातून प्राप्त प्रस्तावांचा सर्वंकष अभ्यास करणे आवश्यक असल्याने शासन निर्णय दिनांक २५/१०/२०२३ अन्वये राज्यातील नवीन महसूल कार्यालय निर्मिती व महसूल विभागातील अन्य विषयांबाबत शिफारशी करण्याकरीता श्री.उमाकांत दांगट (सेवानिवृत्त भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या वेळोवेळी बैठका चालु आहेत. प्रस्तुत समितीकडील कामाची व्याप्ती विचारात घेता समितीने केलेल्या विनंतीनुसार अहवाल सादर करण्याकरीता समितीस दिनांक २५/०७/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यातील तलाठी भरतीची सदोष चौकशी करण्याबाबत

**(१७) २३४२० (१८-०७-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात बेरोजगारांनी आक्रोश आंदोलन करत सदोष तलाठी भरतीची चौकशी करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सविस्तर चौकशी करून अहवाल सादर केला आहे काय, सादर केलेल्या अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०१-०८-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्हा बँकेचे कर्ज पुरवठा धोरण बदलण्याबाबत

**(१८) २३७०६ (१८-०७-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा बँकेने यावर्षी कर्ज पुरवठा विकास सोसायटीचे माध्यमातून न करता थेट बँकेतून करण्याचे धोरण जाहीर केल्यामुळे विविध कार्यकारी संस्थेच्या सचिवांच्या अडचणीत वाढ झाली असून त्यांचे वेतनाचा प्रश्न निर्माण झाला असल्याने बँकेचे धोरण बदलण्याबाबत २९५ सचिवांनी उपनिबंधक यांचेकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२६-०८-२०२४) :** (१) होय खरे आहे.

(२) जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सन २०२४-२५ या कालावधीच्या खरीप पीक कर्ज वाटपाबाबत ज्या विविध कार्यकारी सहकारी संस्था रुपये ५० लाखांवरील अनिष्ठ तफावतीत आहेत अशा २९१ विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या नियमित कर्ज भरणा करणाऱ्या शेतकरी सभासदांना थेट कर्जवाटप करण्याचे धोरण अवलंबले आहे. संचालक मंडळाच्या दिनांक ०२/१२/२०२३ रोजीच्या सभेमध्ये सदर निर्णय घेण्यात आला आहे. सदर धोरणाच्या अनुषंगाने जळगाव जिल्हा गटसचिव संघटनेने निवेदन दिले आहे.

त्यानुसार सदर धोरणाच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६/०४/२०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील निर्णयानुसार जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने अनिष्ठ तफावतीत असलेल्या २८२ संस्थांच्या १४,६६७ सभासदांना रुपये ९३.१६ कोटी इतक्या रकमेचे थेट कर्जवाटप केले आहे. तसेच ५९४ विविध कार्यकारी सहकारी संस्थांमार्फत १,०७,४५७ सभासदांना रुपये ६४६.४५ कोटी इतके कर्जवाटप केले आहे.

सन २०२४-२५ या कालावधीतील खरीप हंगामात जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने रुपये ९२४.७५ कोटी इतक्या लक्षांकापैकी १,५८,१४७ सभासदांना रुपये ९४४.३४ कोटी इतके कर्जवाटप करुन १०२ टक्के लक्षांक साध्य केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात विशेषत: वर्धा व सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेंतर्गतचे प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्याबाबत

**(१९) २३८५८ (३०-०५-२०२४) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारने कुटुंबकर्ता दगावलेल्या व अपघातात अपंगत्व आलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेंतर्गत सन २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षात कृषी विभागाकडे सादर केलेल्या १७० अपघातांच्या प्रस्तावांपैकी ६९ प्रकरणे व सोलापूर जिल्ह्यात १७५ प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिनांक ३० मार्च, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याकरीता तसेच त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१४-०८-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

वर्धा जिल्ह्यामध्ये गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेंतर्गत सन २०२२-२३ या वर्षातील खंडित कालावधीतील एकूण ११९ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ९६ प्रस्तावांना १९१ लाख (९५ मृत्यू- रुपये १९० लाख व १ अंपगत्व- रुपये १ लाख) निधी वितरीत करण्यात आला आहे. उर्वरीत २३ प्रस्ताव कागदपत्रपुर्ततेच्या प्रतिक्षेत आहेत. तसेच सन २०२३-२४ मध्ये गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना सुरु असून सध्यस्थितीत वर्धा जिल्ह्यातील एकूण ७० प्रस्ताव मंजूर आहेत. त्यापैकी ३४ प्रस्तावांना रुपये ६७ लाख (३३ मृत्यू-रुपये ६६ लाख व १ अपंगत्व- रुपये १ लाख) निधि वितरीत केला आहे. उर्वरीत ३६ मंजूर प्रस्तावांना निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेंतर्गत सन २०२२-२३ या वर्षातील खंडित कालावधीतील प्राप्त झालेल्या एकूण ३४१ प्रस्तावांपैकी २९३ प्रस्तावांसाठी मंजूरी दिलेली असून २९३ प्रस्तावास रुपये ५८२ लाख (२८९ मृत्यू- रुपये ५७८ लाख व ४ अपंगत्व-रुपये ४ लाख) निधी वितरीत करणेत आले व उर्वरीत ४८ प्रस्तावांपैकी १४ प्रस्ताव त्रुटीपुर्ततेअभावी प्रलंबित असून ३४ प्रस्तावांची कागदपत्रे छानणी करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सन २०२३-२४ मध्ये गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना सुरु असून सद्य:स्थितीत सोलापूर जिल्ह्याकडून प्राप्त झालेल्या एकूण ३२४ प्रस्तावांपैकी २३२ प्रस्ताव मंजूर आहेत. मंजूर प्रस्तावांपैकी १५४ प्रस्तावांना रुपये ३०७ लाख (१५३ मृत्यू- रुपये ३०६ लाख व १ अपंगत्व- रुपये १ लाख) निधी वितरीत करणेत आले व उर्वरीत ७८ प्रस्तावांना निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) पात्र प्रस्तावांसाठी निधी वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शासकीय नोकऱ्यांमधील दिव्यांगांचा अनुशेष भरण्याबाबत

**(२०) ३२४२४ (१९-०८-२०१७) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय कर्मचारी, महानगरपालिका, जेएनपीटी आदि विविध शासकीय संस्थामधील दिव्यांगांचा अनुशेष भरण्याचे निदेश केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री यांनी राज्य शासनास दिनांक ६ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निदेशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०८-२०२४) :** (१) संबंधित निदेश या विभागात आढळून येत नाहीत.

(२) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २० एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिव्यांग कर्मचाऱ्यांना गट-ड ते गट-अ च्या निम्नस्तरापर्यंत पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यात आले आहे. तसेच दिव्यांग कल्याण विभागाच्या दिनांक १२ मे, २०२३ रोजीच्या पत्रान्वये अंमलबजावणी करण्याच्या सूचना सर्व विभागांना देण्यात आल्या आहेत.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या अनुच्छेद ३४ नुसार दिव्यांगांना सरळसेवेतून ४ टक्के आरक्षण लागू केले जाते. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २० एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्येही आरक्षण देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर